INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 4 | MAY – 2024

# भारतीय राजकारणात आदिवासी स्त्रियांचा सहभाग व आव्हाने झारखंड राज्याच्या संदर्भात विशेष अध्ययन

**Dr. Vidhya Chourpagar**
**Assistant Professor, Dept of Political Science,**
**Dr. Ambedkar College Deekshabhoomi Nagpur**

## प्रस्तावना



भारताच्या पहिल्या आदिवासी राष्ट्रपती म्हणून 2022 मध्ये द्रौपुदी मुर्मू यांनी हा बहुमान मिळविला. हा बहुमान दोन अर्थाने अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. एक म्हणजे स्त्रियांचा राजकारणात अल्प सहभाग असताना देशाच्या सर्वोच्च पदी महिला राष्ट्रपतीची निवड होणे हे निश्चितच दिलासादायक आहे. दुसरे म्हणजे देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर एका आदिवासी महिलेची निवड होणे हे अनेक अर्थांनी ऐतिहासिक होते. या घटनेमुळे सबंध स्त्रीसमाज सुखावून गेला याबाबत दुमत नसावे. परंतु दुसऱ्या बाजूने असेही लक्षात येते कि, भारताच्या राष्ट्रपतिपदावर आदिवासी महिला असली तरी या घटनेमुळे राजकारणात आदिवासी समाजातील महिलांचे प्रमाण येणाऱ्या काळात वाढणार आहे का? वर्षानुवर्षे उच्च जातवर्गीय स्त्री व पुरुषांची मक्तेदारी असलेल्या या क्षेत्रात आदिवासी स्त्रियांचे प्रमाण वाढणार आहे का? त्यांचा निर्णय प्रक्रियेत कितपत समावेश होईल? याबद्दल शंका उपस्थित होणे साहजिक आहे. सध्या देशाच्या संसदेत आदिवासी महिलांचे प्रमाण फक्त 1.8 टक्के आहे. यामागे नेमके कारण काय आहे? आणि सर्वसामान्य घरातून आलेल्या आदिवासी महिलांसाठी राजकारणात स्वत:चे स्थान निर्माण करणे किती आव्हानात्मक आहे? याबाबत विवेचन करणे व आदिवासी स्त्रीयांचा राजकीय सत्तासंघर्ष प्रकाशात आणणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

**मुख्य शब्द :** राजकीय सहभाग, आदिवासी स्त्रिया, राजकीय आव्हाने

## उद्दिष्टे

१. भारतीय राजकारणात आदिवासी स्त्रियांच्या अल्प सहभागाचे विवेचन करणे.
२. विशेषतः झारखंड राज्यातील आदिवासी स्त्रीयांचा राजकीय संघर्ष लक्षात घेऊन या राज्यात स्त्रियांच्या राजकीय सहभागाची आव्हाने समजून घेणे.

३. आदिवासी स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांना समजून घेणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला. विश्लेषण पद्धती व दुय्यम माहितीवर आधारित व्यष्टी अध्ययन ही पद्धत वापरून झारखंड मधील तीन आदिवासी स्त्रियांचा राजकीय संघर्ष समजून घेण्यात येईल.

## आदिवासी बहुसंख्याक राज्यांमधून निवडून गेलेल्या आदिवासी महिला खासदारांची संख्या: १९५२ ते २०१९

भारतीय राजकारणात महिलांची भागीदारी हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठे व महत्वाचे क्षेत्र म्हणून राजकीय क्षेत्राकडे बघितले जाते. या सार्वजनिक क्षेत्रात हजारो वर्षापासून पुरुषांचा प्रभाव, दबाव, वर्चस्व व भागीदारी कायमच मोठ्या प्रमाणात दिसून येते. याशिवाय जातवर्गलिंग आधारित भेदभाव सुद्धा या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बघायला मिळतो. अशा स्थितीत अडाणी, अज्ञानी, निरक्षर असलेल्या निसर्गाचे रक्षण करण्यासाठी कायमचा संघर्ष करीत असेलेल्या आदिवासी स्त्रिया राजकीय क्षेत्रात फारशा दिसत नाही. किंबहुना त्या राजकारण करूच शकत नाही असेच पूर्वग्रह समाजात प्रचलित आहेत. त्यामुळे आदिवासी स्त्रिया केवळ जल, जंगल व पर्यावरण मोहिमेत सहभागी होतात. परंतु त्यांचा सामाजिक आंदोलनातील संघर्ष व सहभाग त्यांना राजकीय क्षेत्रात स्थिर करू शकत नाही त्यामुळे निर्णय प्रक्रियेत आदिवासी स्त्रिया इतर समूहातील स्त्रियांपेक्षा अल्प प्रमाणात दिसतात.

### आदिवासी महिला खासदारांची संख्या: १९५२ ते २०१९ [1]

| अनु. क्र. | राज्ये | महिला खासदारांची संख्या |
|---|---|---|
| १ | मध्यप्रदेश | 12 |
| २ | आंध्रप्रदेश | 08 |
| ३ | ओडिशा | 08 |
| ४ | महाराष्ट्र | 03 |
| ५ | राजस्थान | 03 |
| ६ | छत्तीसगड | 02 |
| ७ | गुजरात | 02 |
| ८ | झारखंड | 02 |
| ९ | कर्नाटक | 01 |
| १० | प. बंगाल | 01 |

वरीलप्रमाणे आकडेवारी दर्शविते की, भारतातील झारखंड या राज्यात केवळ २ महिला खासदार आहे आणि त्याहीपेक्षा कमी कर्नाटक प. बंगाल या राज्यात आहे. २००० ते २०१९ या कालावधीत या राज्याने एकूण चार लोकसभा निवडणुका पाहिल्या. मात्र या चारही निवडणुकांच्या माध्यमातून देशाच्या संसदेत झारखंडमधून चार महिला खासदार देखील निवडून जाऊ

शकल्या नाहीत. इतर राज्याच्या तुलनेत 'झारखंड येथील आदिवासी महिलांचा निवडणूक सक्सेस खूप चांगला आहे. २००५ मध्ये २ महिला, २००९ मध्ये ५ महिला तर २०१४ मध्ये सात महिला विधानसभेत पोहचल्या होत्या.'[2]

## आदिवासी स्त्रियां व आव्हाने

आदिवासी महिलांना राजकीय सहभागात भेडसावणाऱ्या समस्यांची टक्केवारीत आदिवासी भागाचे जास्त प्रमाण आहे.

भारतातील ३३% आदिवासी स्त्रियांना असे वाटते की, 'राजकारणात पुरुषांचे वर्चस्व त्यांच्यासमोर मोठे आव्हान निर्माण करते व त्यांना कोणत्याही निर्णय प्रक्रियेपासून लांब ठेवते.'[3] दुसरे आव्हान म्हणजे स्वतः आदिवासी स्त्रियांमध्ये राजकीय जनजागृतीचा अभाव असणे हे आहे. '31% आदिवासी स्त्रियांना असे वाटते आहे त्यांच्यातील जागरुकतेचा अभावामुळे त्यांच्यासमोर कोणत्याही निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचे आव्हान निर्माण होते.'[4] आदिवासी स्त्रियांसाठी तिसरे आव्हान आहे त्यांची गरिबी तसेच उदरनिर्वाहासाठी सतत होत असेलेले स्थलांतर. '22% लोकांना असे वाटते की दारिद्र्यामुळे व सततच्या स्थलांतरामुळे त्यांना त्यांचा राजकीय सहभाग वाढविण्यास अडचणी येतात. कारण उदरनिर्वाहाच्या शोधात आदिवासी स्त्री-पुरुष कठोर परिश्रम करण्यात व्यस्त असतात.'[5] याशिवाय संस्थात्मक पातळीवर आदिवासी स्त्रियांच्या राजकीय सहभागाला फारसे प्रोत्साहन मिळत नाही. सामाजिक रूढी,प्रथा परंपरांचा प्रभाव कायमच आदिवासी स्त्रियांवर असतो. जातवर्गलिंग आधारित सामाजिक बहिष्कृतता या समूहातील स्त्रियांच्या राजकीय सहभागातील महत्वाचा अडथळा किंवा आव्हान आहेच.

याप्रकारचे आव्हाने आदिवासी स्त्रियांच्या समोर उभी असल्यामुळे भारतीय राजकारणात आदिवासी स्त्रियांचे अल्प प्रमाण दिसून येते .

## झारखंडमधील तीन आदिवासी स्त्रियांचा राजकीय संघर्ष: विशेष अभ्यास

झारखंडमधील तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून असलेल्या तीन आदिवासी स्त्रियांचा राजकीय प्रवास हा अत्यंत संघर्षमय राहिला आहे. या तिन्ही महिला झारखंडमधील जल, जंगल आणि जमीन यांच्याशी निगडीत आंदोलनांचा प्रमुख चेहरा आहेत. समाजकार्यासोबतच राजकारणात प्रवेश करून आदिवासी समूहाचे प्रश्न सोडविण्याची या तिन्ही महिलांची महत्वकांक्षा आहे. परंतु जातवर्गलिंग प्रभावित भारतीय राजकारणात या महिलांचा पूर्णपणे अपेक्षाभंग झाला आहे. यांच्या महत्वकांक्षा विरून गेल्याचे दाहक चित्र झारखंडमध्ये दिसून येते.

### १. मुन्नी हांसदा यांचा राजकीय संघर्ष

मुन्नी हांसदा या दुमकामधील काठिकुंड परिसरातील सामाजिक आंदोलनाचा मुख्य चेहरा म्हणून परिचित आहेत. "झारखंडमधील खनिज संपत्तीचे कॉरपोरेट मानसिकताप्रधान घराण्यांपासून संरक्षण करण्यासाठी मागील कित्येक वर्षांपासून संघर्ष करणाऱ्या आंदोलक महिलांमध्ये मुन्नी हांसदा यांचा समावेश होतो".[6] कित्येक वर्षांपासून त्या आदिवासींचा पेसा कायदा, फॉरेस्ट राईट्स, संथाल परगण्यातील टेनेन्सी ॲक्टसंदर्भात जनजागृती करत आहेंत. त्यांनी 2005-07 मध्ये दुमका येथील "काठीकुंडमध्ये कोलकात्यातील एक मोठी कंपनी एक वीजनिर्मिती प्रकल्प सुरू करू पाहत होती .झारखंडच्या तत्कालीन राज्य सरकारबरोबर त्या कंपनीने करारावर सह्यादेखील केल्या होत्या. मात्र त्या परिसरातील गावकऱ्यांनी केलेल्या विरोधामुळे

आणि दीर्घकाळ चाललेल्या संघर्षामुळे ती कंपनी आणि राज्य सरकार यांना नमते घ्यावे लागले होते."[7] त्यावेळेस मुन्नी हांसदा यांनी कंपनीच्या प्रस्तावाच्या विरोधात संघर्ष केला. हा संघर्ष करताना जवळपास सात महिने तुरुंगवास देखील त्यांनी भोगला होता. कोलकात्यातील कंपनीच्या विरोधात झालेल्या आंदोलनात मिळालेला विजय बहुदा याच संघर्षाचा परिपाक होता.'[8] मुन्नी हांसदा यांनी यानंतरच्या काळात अनेक आंदोलनांचे नेतृत्व केले आणि आदिवासींच्या हक्कांसाठी लढत राहिल्या. सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांना नक्कीच यश मिळाले आहे. सामाजिक आंदोलनात सक्रीय असताना मुन्नी हासंदा स्वत:ची एक राजकीय ओळख देखील निर्माण करू पाहत होत्या .त्यामुळे मुन्नी हांसदा यांनी राजकारणात सक्रीय सहभाग देण्याचा प्रयत्न केला मात्र याकामी लोकांकडून त्यांना पुरेसे पाठबळ मिळाले नाही.

बीबीसी मराठी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत मुन्नी हासंदा म्हणतात, "निवडणुकीत ज्याच्याकडे पैसा आहे, जो गावांमध्ये पैसे वाटतो, दारू पाजतो त्यालाच मते मिळतात. आमच्या समाजात मतदानाबद्दल अद्याप जागरुकता नाही. कोणाला निवडून दिल्याने आपला आवाज लोकसभा किंवा विधानसभेत बुलंद होईल याची अद्याप लोकांना जाणीव नाही."[9]

2009 मध्ये तृणमूल कॉंग्रेस, 2015 मध्ये मार्कसिस्ट कोऑपरेशन आणि 2020 च्या विधानसभा निवडणुकीत टीएमसीच्या तिकिटावर मुन्नी हासंदा यांनी शिकारीपाडा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. मात्र या तिन्ही पक्षांना झारखंडमध्ये कोणताही जनाधार नव्हता. त्यामुळे मुन्नी हांसदा निवडणूक हरल्या. त्यांच्या मते, "त्यांच्यासारख्या सर्वसाधारण कुटुंबातून आलेल्या महिलेला राजकारणात स्वत:च्या हिंमतीवर स्थान निर्माण करणे खूपच कठीण गोष्ट आहे."[10]

राजकरणात महिलांना का स्थान मिळत नाही? याबद्दलची त्यांनी नोंदवलेली निरीक्षणे अशी आहेत की, "कोणताही मोठा पक्ष आदिवासी स्त्रियांना पक्षाचे तिकिट देत नाही. तुमच्याकडे जर पैशांची ताकद असेल, साधनसंपत्ती असेल, भरभक्कम राजकीय पार्श्वभूमी असेल तरच तिकिट मिळण्याची आशा असते. मात्र जर तुमच्याकडे या तीनपैकी काहीही नसेल आणि त्यातही तुम्ही महिला असाल तर तुमच्यासाठी सर्व दारे बंद होतात."[11] यावरून भारतीय राजकारणात महिलांच्या राजकीय सहभागाबद्दलची संकुचित व वर्चस्ववादी भूमिका लक्षात घ्यावी लागेल.

सध्या मुन्नी हांसदा ग्रामसभांमध्ये राजकारणाचे महत्व पटवून सांगणे आदिवासींना त्यांच्या मताचे महत्त्व लक्षात आणून देणे इत्यादी प्रकारची कामे करीत आहे. हे काम करताना त्यांना आशा वाटते की एक दिवस त्यांच्या समाजाच्या लोकांना त्यांचे म्हणणे नक्की पटेल आणि आदिवासी लोक त्यांच्यासारख्या महिलांच्या पाठीशी उभे राहतील.

## २. वासवी किड़ो यांचा राजकीय संघर्ष

विस्थापितांशी संबंधित असंख्य आंदोलनांचा प्रमुख चेहरा म्हणून डॉ. वासवी किडो परिचित आहेत. तसेच 2019 च्या विधानसभा निवडणुकीत कोणत्याही मुख्य पक्षाकडून तिकीट न मिळाल्यामुळे त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणून झारखंड मधील हटिया मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. राजकीय पक्षांबद्दल त्या म्हणतात, "झारखंड असो की राष्ट्रीय स्तरावरील राजकारण असो... राजकीय पक्षांबद्दल एक बाब स्पष्ट आहे ती म्हणजे, उच्चशिक्षित, संघर्षातून पुढे आलेल्या महिला त्यांना अजिबात पसंत नसतात. कमी बोलणाऱ्या, सुंदर दिसणाऱ्या आणि छान-छान साड्या नेसणाऱ्या महिलांना ते अधिक महत्त्व देतात. कारण या महिला त्यांच्याशी वादविवाद करणार नाहीत, हक्कांविषयी बोलणार नाहीत आणि विविध मुद्दे मांडणार नाहीत."[12] यावरून हक्क आणि अधिकारांची जाणीव असणाऱ्या आदिवासी स्त्रियांना सुद्धा राजकीय हक्क सहजासहजी मिळत नाही, हे वासवी किडो यांच्या अनुभावरून सांगता येईल.

मुन्नी हासंदा प्रमाणेच वासवी किडो सुद्धा राजकीय पक्षांवर भाष्य करताना सांगतात कि "आदिवासी महिलांना राजकीय पक्ष तिकिट देत नाहीत कारण त्यांना वाटते यांच्याकडे ज्ञान नाही. या स्त्रिया खूप संघर्ष करतात, सामाजिक आंदोलने करतात, प्रसंगी बाजूही मांडतात परंतु यांच्याकडे राजकारणात सर्वसाधारणपणे ज्या पद्धतीची पार्श्वभूमी अपेक्षित असते तशी ती नसते."[13] त्यामुळे त्या राजकारणात अल्प संख्येत दिसतात.

"राजकीय पक्षांकडून त्यांना सक्षम करणे, योग्य संधी देणे यावर कोणतेही काम होत नाही. त्यामुळेच राजकारणात स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी आदिवासी महिलांना इतर समूहातील महिलांच्या तुलनेत अधिक प्रमाणात आव्हांनाना तोंड द्यावे लागते आहे."[14] या सर्व परिस्थितीमुळे आदिवासी महिलांचे नगण्य राजकीय प्रतिनिधित्व स्पष्टपणे दिसते.

### ३. दयामनी बारला यांचा राजकीय संघर्ष

दयामनी बारला यांची झारखंडची आयर्न लेडी म्हणून ख्याती आहे. देशात आणि जगभरात दयामनी बारला परिचित आहे. "मागील एक दशकभरापासून त्या नवीन आणि स्थानिक पक्षांच्या पाठिंब्यावर निवडणुका लढवत आहेत. काही महिन्यांआधीच त्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्या खूंटी किंवा लोहरदगा लोकसभा मतदारसंघातून निवडून लढवण्यास इच्छूक होत्या. मात्र त्यांना पक्षाकडून तिकिट न मिळाल्यामुळे निवडणूक लढवू शकल्या नाही."[15] दयामनी बारला म्हणतात, "तिकिट मिळण्याची गॅरंटी मिळो ना मिळो, लोकसभेत निवडून येण्याची खात्री असो की नसो, विधानसभा तिकिटाची खात्री असो की नसो, मात्र राजकारणात स्वत:चे स्थान निर्माण करायचे आहे, संघर्ष करायचा आहे. एक ना एक दिवस यश नक्कीच मिळेल. आम्ही नेहमीच म्हणतो, लढू आणि जिंकू...आम्ही लोकांनी कित्येक आंदोलन उभी केली आहेत आणि जिंकलो आहोत. यापुढेही आंदोलनात देखील लढू आणि जिंकू"[16] या प्रकारचा आत्मविश्वास दयामनी बारला व्यक्त करतात. यावरून वासवी किडो यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षाकडे सकारात्मक दृष्टीने झारखंडच्या राजकीय पक्षांनी बघणे गरजेचे आहे.

### निष्कर्ष

वरील अभ्यासावरून काही निष्कर्ष हाती लागतात ते म्हणजे, स्थानिक, राज्य व देश पातळीवर राजकीय पक्ष आदिवासी स्त्रीयांना राजकारणात सामावून घेण्यात फारसे अनुकूल नसतात. आदिवासी स्त्रिया हक्क व अधिकारांच्या बाबतीत खूप जागृत असल्या तरी दारिद्र्य व शिक्षणाचा अभाव असल्यामुळे बहुसंख्य स्त्रिया राजकारणाकडे पाठ फिरवतात. ज्या स्त्रियांच्या राजकीय महत्वकांक्षा उच्च कोटीच्या असतात त्या स्त्रियांना राजकीय पक्ष दूर लोटतात. आज भारताच्या राष्ट्रपतीपदावर दोन वर्षांपूर्वी द्रौपदी मुर्मू यांची निवड झाल्यानंतर आदिवासी महिलांमध्ये निश्चितच आत्मविश्वास तर वाढला आहे मात्र एवढेच पुरेसे नाही. कुटुंब, समाज, राज्य व देशपातळीवर आदिवासी महिलांना राजकीय बळ मिळण्यासाठी जोरदार प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे.

## संदर्भ सूची


1. https://www.bbc.com/marathi/articles/cxrzv27qdxyo
2. https://www.jagran.com/elections/jharkhand-vidhan-sabha-tribal-women-play-a-important-role-in-jharkhand-assembly-election2019-19771711.html Jharkhand Election 2019: झारखंड की सियासत में परचम लहराती रही हैं आदिवासी महिलाएं, Sujeet Kumar Suman, Tue, 19 Nov 2019

3. https://thirdvoice.voiceforvoiceless.in/wpcontent/uploads/2023/01/Challenges-Faced-by-Tribal-Women-in-PoliticalParticipation2.pdfChallenges-Faced-by-Tribal-Women-in-Political-Participation2.pdf (voice for voiceless.in)
4. Ibid
5. Ibid
6. https://www.bbc.com/marathi/articles/cxrzv27qdxyo
7. Ibid
8. Ibid
9. Ibid
10. Ibid
11. Ibid
12. https://www.bbc.com/marathi/articles/cxrzv27qdxyo
13. Ibid
14. Ibid
15. Ibid
16. Ibid